# Finance Department:

| अर्ज भरण्याची कार्यपद्धती आणि सुचना :- | |
|---|---|
| 1) | उमेदवाराला www.mahapariksha.gov.in+ या संकेतस्थळावर लॉगइन करावे लागेल. उमेदवाराने आपल्या उजव्या बाजूला असलेल्या 'सूचना' या पर्यायावर क्लिक करावे. तिथून उमेदवाराला थेट नोंदणीच्या पोर्टलवर नेले जाईल. पहिल्यांदाच नोंदणी केली जात असल्यास उमेदवाराने नोंदणीच्या पर्यायावर क्लिक करून यूजर नेम, पासवर्ड आणि इमेल आयडी टाकावा. उमेदवाराला त्यानंतर त्याच्या/तिच्या प्रमाणित इमेल आयडीवर सक्रीयतेची लिंक मिळेल जी त्यांच्या साइनअपशी संबंधित असेल. उमेदवाराने त्याचे/तिचे खाते सक्रीय करण्यासाठी त्याच्या/तिच्या इमेल आयडीवर मिळालेल्या सक्रीयतेच्या लिंकवर क्लिक करावे.( Activation लिंक ही २ दिवसांकरिता activate असेल.) उमेदवाराने त्याची/तिची लॉगइनची माहिती गोपनीय ठेवावी. एकदा खाते सक्रीय झाले की, उमेदवाराला त्यांच्या नोंदणी पोर्टलचे युजरनेम आणि पासवर्ड वापरून केव्हाही लॉग इन होता येईल<br>टीप : USERNAME आणि PASSWORD जतन करण्याची जबाबदारी उमेदवाराची असेल . |
| 2) | उमेदवाराचे नाव, वडीलांचे, पतीचे नाव, आडनाव, वडिलांचे नाव, आईचे नाव, जन्मदिनांक, भ्रमणध्वनी क्रमांक, छायाचित्र, स्वाक्षरी ही मुलभूत माहिती आहे जी उमेदवाराला सविस्तर द्यावी लागेल. |
| 3) | छायाचित्र आणि स्वाक्षरी अपलोड करण्यासंबंधी माहिती - कृपया उंची आणि रुंदी प्रत्येकी 200 pixel असलेले छायाचित्र स्कॅन करुन अर्जामध्ये अपलोड करा. प्रतिमेची उंची 60 पिक्सल आणि रुंदी 140 पिक्सल असावी. प्रतिमेचे आकारमान 3 KB ते 50 KB च्या दरम्यान असावे. (टिप :- उमेदवाराने अलीकडील छायाचित्र (फोटोग्राफ) अपलोड करणे आवश्यक आहे .) |
| 4) | पत्ता टाकण्यासाठी उमेदवाराने आपल्या पत्त्याचा प्रकार निश्चित करावा. उदा. कायमस्वरुपी पत्ता, तात्पुरता पत्ता किंवा दोन्ही आणि त्यानुसार आपले गाव, पोस्ट ऑफिस, राज्य, जिल्हा, पिन कोड इ.सहित माहिती भरावी. |
| 5) | त्यानंतर उमेदवाराने अतिरिक्त माहितीच्या पर्यायावर क्लिक करावे आणि आपल्या जात प्रवर्गाबद्दल माहिती भरावी. उमेदवाराकडे जात प्रमाणपत्र असल्यास त्याबद्दल विचारणा केली जाईल. असल्यास ड्रॉपडाऊन मधून त्याने / तिने आपला जात प्रवर्ग निवडावा. |
| 6) | जर एका उमेदवाराने एकापेक्षा अधिक अर्ज केले असल्याचे आढळून आले तर अशा उमेदवारांची उमेदवारी रद्द केली जाईल. |
| 7) | ज्यांच्याकडे आधार क्रमांक आहे त्यांनी तत्संबंधी माहिती भरावी, तसेच उमेदवाराने आधार क्रमांक/ आधार नोंदणी क्रमांक याबद्दलची माहिती द्यावी . |
| 8) | समांतर आरक्षण (लागू असल्यास ) त्यासंबंधीची माहिती द्यावी लागेल . |

<table>
<tr><td>9)</td><td>तसेच मराठी भाषेतील प्राविण्य, MS-CIT प्रमाणपत्र, आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांचे पाल्य, अपंगत्वाचा प्रकार (लागू असल्यास ) यासंबंधीची माहिती द्यावी लागेल . उमेदवाराकडे MS-CIT प्रमाणपत्र किंवा समतुल्य IT प्रमाणपत्र नसेल तर तो अर्ज करू शकणार नाही.</td></tr>
<tr><td>10)</td><td>शैक्षणिक अर्हता भरताना उमेदवाराने आपली सविस्तर शैक्षणिक माहिती भरावी. शैक्षणिक पात्रतेमध्ये जाहिरातीमध्ये नमूद केल्याप्रमाणे माहिती देणे अनिवार्य आहे, तरच आपणास त्या पदासाठी अर्ज करता येईल.</td></tr>
<tr><td>11)</td><td>एकदा शैक्षणिक तपशिल प्रविष्ट केले की अर्जदार ‘पुढे’ (NEXT) या बटणावर क्लिक करावे लागेल, त्या बटणावर क्लिक केल्यानंतर अर्जदाराला ‘पुष्टीची’ (CONFIRM) विनंती केली जाईल की त्यांनी ते बटण क्लिक केल्यास मागील तपशील संपादित करण्याची परवानगी दिली जाणार नाही.</td></tr>
<tr><td>12)</td><td>उमेदवार हा एका गटातील पदांसाठी अर्ज करेल तेव्हा तो एकाच महसूली विभागासाठी अर्ज करेल. उमेदवार त्याच्या शैक्षणिक अर्हतेनुसार गट क्रमांक 1 किंवा गट क्रमांक 2 किंवा दोन्ही गटातील पदांसाठी अर्ज करू शकेल. गट क्रमांक 1 तसेच गट क्रमांक 2 या दोन्ही गटातील पदांसाठी अर्ज करणाऱ्या उमेदवारास दोन वेगवेगळया महसुली विभागाची निवड करण्याची मुभा राहील.<br><table><tr><th>गट क्र. 1</th><th>गट क्र.2</th></tr><tr><td>• Junior Accountant/JuniorAuditor_Amravati<br>• Junior Accountant/JuniorAuditor_Aurangabad<br>• Junior Accountant/Junior Auditor_Konkan<br>• Junior Accountant/Junior Auditor_Pune<br>• Junior Accountant/Junior Auditor_Nashik<br>• Junior Accountant/Junior Auditor_Nagpur</td><td>• Account Clerk/Audit Clerk_Amravati<br>• Account Clerk/Audit Clerk_Aurangabad<br>• Account Clerk/Audit Clerk_Konkan<br>• Account Clerk/Audit Clerk_Pune<br>• Account Clerk/Audit Clerk_Nashik<br>• Account Clerk/Audit Clerk_Nagpur</td></tr></table></td></tr>
<tr><td>13)</td><td>त्यानंतर उमेदवारास सर्व पदांसाठी आवश्यक असलेली पात्रतेबद्दलची माहिती देऊन ती सेव्ह करणे आवश्यक आहे.</td></tr>
<tr><td>14)</td><td>उमेदवार नोंदणी अर्जामध्ये दिल्याप्रमाणे परिक्षा केंद्राकरिता तीन प्राधान्यक्रम निवडू शकतो. तीनही पसंतीक्रमात उमेदवाराने निवडलेल्या पर्यायांपैकी एकही परीक्षा केंद्र उपलब्ध नसल्यास , उमेदवारास उपलब्ध केंद्रापैकी एक केंद्र नेमून देण्यात येईल.</td></tr>
</table>

| | |
|---|---|
| 15) | उमेदवाराने सगळया नियम व अटी वाचून मान्यता दर्शविण्यासाठी दिलेल्या जागी क्लिक करावे. त्यानंतर ऑनलाईन पद्धतीने (इंटरनेट बँकिंग, क्रेडिट कार्ड /डेबिट कार्ड, भीम UPI) आवश्यक तो परीक्षा शुल्क भरणा करावा. मान्यता दर्शविल्यानंतरच अर्ज दाखल करण्यासाठीचा ‘सबमिट’ हा पर्याय उपलब्ध होईल. उमेदवाराला त्याचा अर्ज डाऊनलोड किंवा प्रिंट करण्याचा पर्याय असेल. |
| 16) | ऑनलाईन अर्ज स्विकारण्याच्या अंतिम तारखेस मध्यरात्री 12.00 वाजता संकेतस्थळावरील लिंक बंद केली जाईल. |
| 17) | जर कोणत्याही उमेदवाराने एकापेक्षा अधिक लॉगिन आयडीसह नोंदणी केली असेल तर उमेदवारांची फक्त पहिली यशस्वी नोंदणी पुढील प्रक्रिया जसे, हॉल तिकीट, परीक्षेत उपस्थिती, गुणवत्ता यादी आणि अन्य संबंधित प्रक्रियांसाठी विचारात घेण्यात येईल, कोणत्याही डुप्लीकेट नोंदणीस अवैध नोंदणी मानले जाईल आणि भरलेल्या परीक्षा शुल्काचा परतावा केला जाणार नाही. उमेदवाराद्वारे प्रथम यशस्वी नोंदणीमध्ये काही चुकीची माहिती देण्यात आली असेल तर कृपया या विषयाबद्दलची योग्य प्रक्रिया जाणून घेण्यासाठी enquiry@mahapariksha.gov.in वर लिहा किंवा टोल फ्री नंबर 180030007766 वर कॉल करा.<br>**नोंद :-** नोंदणी मधील तपशील जसे की वापरकर्ता नाव (USERNAME), ई मेल आयडी, प्रवर्ग आरक्षण (लागू, समांतर किंवा प्रवर्ग आरक्षण) , पसंतीचे स्थान, जन्मतारीख उमेदवाराचे छायाचित्र (फोटोग्राफ) आणि स्वाक्षरी इत्यादी फॉर्म सादर केल्यानंतर बदलण्याची परवानगी दिली जाणार नाही. |
| **अर्जातील माहितीचे पूर्वावलोकन:-** | |
| 1) | युजरनेम आणि पासवर्ड वापरुन लॉगइन केल्यावर उमेदवार आपला संक्षिप्त अर्ज पाहू शकतो. |
| 2) | अर्ज प्रिंट करण्यासाठी **“प्रिंट प्रिव्हयू”** या पर्यायावर क्लिक करा.<br>नोंद :उमेदवाराने आपला PDF स्वरूपातील अर्ज, परीक्षा प्रवेश पत्र संपूर्ण भरती प्रक्रिया पूर्ण होई पर्यंत स्वतः जवळ ठेवावा. |
| **महत्त्वाच्या सूचना:** | |
| | 1)उमेदवाराने आपल्या अर्जात उपलब्ध करून देण्यात आलेल्या तीनही पसंतीक्रमाच्या यादीतील प्रत्येकी एका पर्यायांची निवड करणे आवश्यक आहे. तीनही पसंतीक्रमात उमेदवाराने निवडलेल्या पर्यायांपैकी एकही परीक्षा केंद्र उपलब्ध नसल्यास, उमेदवारास उपलब्ध केंद्रापैकी जवळील परीक्षा केंद्र नेमून देण्यात येईल.<br>२) उमेदवारास देण्यात आलेले परीक्षा केंद्र कोणत्याही परिस्थितीमध्ये बदलण्यात येणार नाही.<br>3) परीक्षा केंद्र किंवा परीक्षा केंद्राचे शहर बदलण्याची विनंती कोणत्याही परिस्थितीमध्ये (वैद्यकीय किंवा इतर कारणांसाठी) स्वीकारली जाणार नाही. उमेदवाराने त्याची प्रवासाची व्यवस्था त्यानुसार आधीच ठरवावी.<br>4) जर एका उमेदवाराने एकापेक्षा अधिक अर्ज केले असल्याचे आढळून आले तर अशा उमेदवारांची उमेदवारी रद्द केली जाईल. |

| | |
|---|---|
| | 5) उमेदवाराने भरणा केलेले परीक्षा शुल्क कोणत्याही परिस्थितीमध्ये (अनेकदा अर्ज करणे, अर्ज चुकणे, काही कारणास्तव परीक्षेस बसू न शकणे, इत्यादी अशा कारणांसाठी) परत केले जाणार नाही. |